क्र.का-३/संगणकीकरण/विद्युतीकरण/६६९/२०११.
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य,पुणे यांचे कार्यालय,पुणे
दिनांक : ०९/१२/२०११

प्रति,
सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक
सर्व सह जिल्हा निबंधक

**विषय** :- दुय्यम निबंधक कार्यालयात सरिता-३ प्रणाली कार्यान्वित करण्याच्या दृष्टीने खाजगी जागेत भाडेतत्वावर कार्यरत कार्यालयांमध्ये आवश्यक विद्युतीकरण करण्याबाबत.

दुय्यम निबंधक कार्यालयात नोंदणी झालेल्या दस्तांचे अभिलेख जतन करणे ही दुय्यम निबंधक कार्यालयांची मूलभूत वैधानिक जबाबदारी आहे. त्यादृष्टीने योग्य त्या सुरक्षा उपाययोजना दुय्यम निबंधक कार्यालयात करण्यात आलेल्या आहेत. तथापी मागील काही कालावधीमध्ये धुळे, ठाणे इत्यादी कार्यालयांमध्ये सदोष अथवा जीर्ण विद्युतीकरणामुळे आग लागण्याचे व त्यामुळे उक्त कार्यालयातील दस्तांचे अभिलेखांची हानी होण्याचे प्रकार घडले आहेत. अशा प्रकारांची पुनरावृत्ती होऊ नये याकरीता, तसेच दस्त नोंदणीच्या सरिता-३ प्रणालीसाठी दुय्यम निबंधक कार्यालयांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या नविन संगणक सामुग्रीचा वापर सुरु करण्याचे दृष्टीने दुय्यम निबंधक कार्यालयातील विद्युतीकरणाचा आढावा घेतला असता, जवळपास सर्व कार्यालयात नव्याने दर्जेदार व सुरक्षीत विद्युतीकरण करणे आवश्यक असल्याचे दिसून आले आहे.

शासकीय जागेत कार्यरत दुय्यम निबंधक कार्यालयातील विद्युतीकरणाचे बाबतीत स्वतंत्ररित्या सूचना देण्यात आल्या आहेत.

खाजगी जागेत भाडेतत्वावर कार्यरत दुय्यम निबंधक कार्यालयांचे बाबतीत आढाव्याअंती असे दिसून आले आहे की, सर्वसाधारणपणे उभयपक्षात ठरलेल्या अटी-शर्तीनुसार / करारानुसार जागा मालकाने साधारण कार्यालयीन वापरासाठी आवश्यक तेवढे विद्युतीकरण (ट्युबलाईट, पंखा इत्यादी उपकरणांसाठी आवश्यक पॉईंट) करुन देण्याची तरतुद असते. दस्तनोंदणीच्या संगणक प्रणाली सारख्या सातत्याने वापरात असणा-या प्रणाली करीता आवश्यक त्या संख्येत, तसेच दर्जेदार व सुरक्षीत विद्युतीकरण जागा मालकाने करुन देण्याची तरतुद नसते.

याकरीता **खाजगी जागेत भाडेतत्वावर कार्यरत** दुय्यम निबंधक कार्यालयांचे बाबतीत नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी कार्यालयनिहाय आढावा घ्यावा. ज्या जागेच्या बाबतीत सर्व प्रकारचे विद्युतीकरण (संगणकप्रणाली सहीत) करुन देण्याची जबाबदारी जागा मालकावर असेल त्या कार्यालयाच्या बाबतीत त्याप्रमाणे सर्वंकष विद्युतीकरण जागा मालकाकडून करुन घ्यावे. ज्या जागांच्याबाबतीत संगणक प्रणालीसाठी आवश्यकत्या संख्येत, दर्जेदार व सुरक्षीत विद्युतीकरण करुन देण्याची जबाबदारी जागा मालकावर नाही, त्या जागेंचे बाबतीत सरिता-३ साठी आवश्यक त्याप्रमाणात विद्युतीकरण करण्याच्या बाबतीत नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी कार्यालयनिहाय उपलब्ध विद्युतीकरणाची स्थिती विचारात घेऊन निर्णय घ्यावा. त्या दृष्टीने सार्वजनिक बांधकाम विभागाचे विद्युत विभागाशी सल्लामसलत करुन पुढीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहेत.

१) सदर कार्यालयांच्या आवश्यकतांचा सर्वसाधारणपणे विचार करुन कार्यकारी अभियंता, पुणे विद्युत विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग पुणे यांनी नमुना अंदाजपत्रक तयार केले असून ते यासोबत जोडण्यात आले आहे.

**२) सह जिल्हा निबंधकांनी खाजगी जागेत भाडेतत्वावर कार्यरत कार्यालयांचा आढावा घ्यावा. जी कार्यालये सध्याच्या जागेत पुढे किमान १ वर्ष कार्यरत राहण्याची शक्यता आहे त्याच कार्यालयामध्ये या पुढीलप्रमाणे विद्युतीकरण करावयाचे आहे.**

३) सह जिल्हा निबंधक यांनी त्यांचे जिल्ह्याचे कार्यकारी अभियंता / उप अभियंता, विद्युतविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचेशी त्वरीत संपर्क साधून उपरोक्त क्र.२ मधील निकषाची पूर्तता करणा-या खाजगी जागेत भाडेतत्वावर कार्यरत दुय्यम निबंधक कार्यालयांची पाहणी करण्याचे नियोजन करुन त्यासाठी आवश्यक व्यवस्था करावी. सदर अभियंत्यांनी सोबतचे नमुना अंदाजपत्रकातील तांत्रीक तपशीलानुसार त्या त्या कार्यालयांसाठी कार्यालयांच्या आवश्यकता विचारात घेऊन स्वतंत्र अंदाजपत्रके तयार करावीत व सह जिल्हा निबंधकांकडे सादर करावीत. सदर कार्यवाही दि.२०/१२/२०११ पर्यंत पुर्ण करण्यात यावी.

४) सह जिल्हा निबंधक यांनी सदर अंदाजपत्रकांमध्ये सरिता-३ साठी आवश्यक तेवढ्याच विद्युतीकरणाचा समावेश असल्याची खातरजमा करुन, सदर अंदाजपत्रके विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक यांचेकडे सादर करावीत व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक यांनी अंदाजपत्रकास कार्यालय निहाय प्रशासकीय मान्यता द्यावी व त्या आदेशाची एक प्रत या कार्यालयास पाठवावी. सदर कार्यवाही दि.२४/१२/२०११ पर्यंत पुर्ण करण्यात यावी.

५) प्रशासकीय मान्यतेचे आदेश प्राप्त होताच सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी कामास त्वरीत सुरुवात करावी. पहिल्या टप्प्यात सरिता-३ सुरु करण्यासाठी निवडण्यात आलेल्या १०० कार्यालयांपैकी कार्यालयात दि.५/१/२०१२ पर्यंत व उर्वरीत कार्यालयात दि.१५/१/२०१२ पर्यंत काम पूर्ण करण्यात यावे.

६) खाजगी जागेत भाडेतत्वावर कार्यरत असलेल्या ज्या दुय्यम निबंधक कार्यालयात सोबतच्या अंदाजपत्रकामध्ये नमूद तांत्रीक तपशीलाप्रमाणे व आवश्यक संख्येत पॉईंटस् अलाहिदा उपलब्ध असतील त्यामुळे वरीलप्रमाणे विद्युतीकरण नव्याने करण्याची आवश्यकता नसेल तर याप्रमाणे कार्यकारी अभियंता / उप अभियंता, विद्युतविभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांचे कडून वायरिंगची तपासणी करुन घ्यावी व अर्थिंग योग्य असल्याची खातरजमा करावी व तसे प्रमाणपत्र या कार्यालयास दि.२०/१२/२०११ पर्यंत सादर करण्यात यावे.

**का.प्र.मा.नों.म.नि.** **सही/-**
**यांचे सहीची असे.** **नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,**
**महाराष्ट्र राज्य, पुणेकरिता...**

**प्रत :-** कार्यकारी अभियंता, पुणे विद्युत सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे.

२/- त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रमाणे कार्यवाहीच्या सूचना राज्यातील सर्व कार्यकारी अभियंता / उप अभियंता (विद्युत) सार्वजनिक बांधकाम विभाग यांना द्याव्यात